वर्ष- ११ | अंक- ५० | मुंबई, मंगळवार, २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

आतड्यांमधील जमलेली घाण झपाट्याने काढून टाकतील 'हे' ज्यूस?

3 → संशयास्पद मतदार याद्यांमुळे संभ्रमाचे वातावरण!

महाराष्ट्रातील महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणात धक्कादायक ट्विस्ट! ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

मद्यविक्रीचा परवाना नाही, तरी सुरू धंदा; पोलिसांकडून हॉटेल मालकाला धडा



मुंबई :

मद्यविक्रीचा परवाना नसताना ग्राहकांना बेकायदेशिररित्या मद्यविक्री करणारे हॉटेल चालक मालक यांचेवर काशिमीरा पोलीस ठाण्याची कारवाई. अधिकमाहितीनुसार दिनांक २५/१०/२०२५ रोजी काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत मुंशी कंपाउंड, मिरागाव येथील अड्डा बार □न्ड रेस्टॉरंट येथील दुस□या माळ्यावर हॉटेलचे चालक मालक हे ग्राहकांना विनापरवाना दारु विक्री करुन सदर ठिकाणी ग्राहकांना दारु पिण्याकरीता जागा उपलब्ध करुन दिली असुन सदर ठिकाणी ग्राहक दारु पिवुन लाउड स्पिकरवर गाणी वाजवुन नृत्य करीत असल्याबाबत गुप्त बातमी प्राप्त झाली होती. सदर माहीतीच्या अनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाणे व मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१ मिरारोड यांचेकडील पथकाने संयुक्तपणे छापा कारवाई करुन हॉटेलचे चालक/मालक व ग्राहकांना दारु पुरविणारे वेटर असे एकूण ११ जणांना ताब्यात घेण्यात आले असून नमुद बारमध्ये विनापरवाना विक्रीकरीता ठेवलेल्या रेडलेबल, रॉयल स्टॅग, ऑक स्मित, ब्लेंडर प्राईड, कॅमिनो टकीला व इतर विदेशी मद्याच्या एकुण-१,१८,४५५/- रुपये किमतीच्या दारुच्या बाटल्या जप्त करण्यात आलेल्या आहेत. नमुद हॉटेलचे चालक/मालक/वेटर असे एकूण ११ जणांविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. वरील कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. राहुल चव्हाण, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, मा. श्री. गणपत पिंगळे, सहायक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, श्री. राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि/श्रीराग कारंडे, पोउनि/संजय लोखंडे, सफी/विजय गंभिरराव, सफी/ रणजित शिंदे, पो.शि/ विपुल सावंत, पो.शि/ लोखंडे, पो. शि/ बुल्हे, मपोशि/ सिता ठेंगडे नेमणुक-काशिमीरा पोलीस ठाणे तसेच सपोनि/राम सुरवसे, पोउनि/राजेंद्र निकम, पो. शि/चव्हाण, पो.शि/भोये यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

बेस्टच्या ताफ्यात 157 इलेक्ट्रिक बसेस; लोकार्पण सोहळ्यात शिंदेंचा टोला

मुंबई,

मुंबईने आज पर्यावरणपूरक विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे वळण घेतले आहे. तब्बल 157 इलेक्ट्रिक बसेस आज बृहन्मुंबई इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट (बेस्ट)च्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत. यामुळे सुमारे तीन लाख प्रवाशांचा प्रवास अधिक आरामदायी, स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त होणार आहे. या उपक्रमामुळे मुंबईचे आकाश स्वच्छ, आणि रस्ते हरित ऊर्जेच्या दिशेने वाटचाल करणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. यावेळी एकनाथ शिंदे यांनी कोणाचेही नाव न घेता उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्त्वातील महाविकास आघाडी सरकारवर बोचरी टीका केली. आधीच्या सरकारने बेस्टला वेस्ट केले, असा आरोप त्यांनी केला. कुलाबा येथे पार पडलेल्या बेस्टच्या या पर्यावरण स्नेही इलेक्ट्रिक बस लोकार्पण सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री आशिष शेलार, मंत्री मंगल प्रभात लोढा, वरिष्ठ अधिकारी भूषण गगराणी, सोनिया शेट्टी यांच्यासह बेस्टचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबईत एकेकाळी ट्राम आणि बग्गी धावत होती. आज त्या ठिकाणी वातानुकूलित आणि पर्यावरण स्नेही इलेक्ट्रिक बसेस धावणार आहेत. टप्प्याटप्प्याने सर्व बसेस पर्यावरणपूरक बनवण्याचा आमचा संकल्प आहे. ही केवळ वाहतुकीतील सुधारणा नसून मुंबईच्या विकासाचे हरित वळण आहे.

त्यांनी बेस्टला वेस्ट केले

ते पुढे म्हणाले, महायुती सरकार म्हणजे गतिमान सरकार. कुलाब्यातील लोकार्पणाबरोबरच गोरेगाव येथील बसेसचे उद्घाटनही ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत आहे. हा फक्त कार्यक्रम नाही, तर वचनपूर्तीचा सोहळा आहे. शिंदे यांनी सांगितले की, पूर्वीच्या सरकारच्या काळात बेस्ट सेवा डबघाईला आली होती, पण महायुती सरकार आल्यावर बेस्टला पुन्हा नवसंजीवनी मिळाली. आधीच्या सरकारने बेस्टला वेस्ट केले, मात्र आम्ही 3,400 कोटी रुपये निधी दिला असून यंदा आणखी 1,000 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई महापालिकेचे सातत्याने सहकार्य बेस्टला मिळत असल्याचे सांगून शिंदे म्हणाले, आम्ही फक्त कार्यालयात नाही तर रस्त्यावर उतरून काम करतो. महायुती सरकारने मुंबईचा विकास वेगाने पुढे नेण्याचा निर्धार केला आहे.

मुंबई वन ऍप मुळे अनेक सुविधा

ते पुढे म्हणाले, इलेक्ट्रिक बसेसच्या माध्यमातून प्रदूषणाला आळा बसणार आहे. ही फक्त सुरुवात असून, लवकरच आणखी मोठ्या प्रमाणावर पर्यावरण स्नेही वाहतूक सुविधा निर्माण केल्या जातील. मुंबई वन ऍप मुळे प्रवाशांना बसचे लाईव्ह लोकेशन, एकाच तिकिटावर विविध सेवा, तसेच दिव्यांग प्रवाशांसाठी सुविधा उपलब्ध होतील.



जागतिक स्ट्रोक दिन - २९ ऑक्टोबर

करवा चौथच्या उपवासामुळे झालेल्या डिहायड्रेशनमुळे स्ट्रोकचा तीव्र धोका – वोक्हार्ट हॉस्पिटल्स, मीरा रोडकडून जागतिक स्ट्रोक दिनानिमित्त गंभीर प्रकरणावर प्रकाश

मुंबई,

जागतिक स्ट्रोक दिनानिमित्त वोक्हार्ट हॉस्पिटल्स, मीरा रोड यांनी एका खऱ्या घटनाद्वारे डिहायड्रेशन (पाण्याची कमतरता) हा स्ट्रोकचा अत्यंत धोकादायक परंतु कमी ओळखला जाणारा घटक असल्याचे अधोरेखित केले आहे. वोक्हार्ट हॉस्पिटल्स, येथील कन्सल्टंट इंटरव्हेन्शनल न्युरोलॉजिस्ट व स्ट्रोक स्पेशालिस्ट डॉ. पवन पै यांनी ३३ वर्षीय महिलेला झालेल्या गंभीर स्ट्रोकचे प्रकरण मांडले, ज्यांना करवा चौथच्या उपवासादरम्यान दीर्घकाळ पाणी न घेतल्यामुळे स्ट्रोक झाला.

१० ऑक्टोबर रोजी संबंधित रुग्णाने संपूर्ण दिवस निर्जल (पाणी न घेता) उपवास केला होता. रात्री सुमारे ९:३० वाजता, उपवास सोडण्याच्या काही क्षणांपूर्वीच तिला डाव्या बाजूला तीव्र अशक्तपणा जाणवला आणि ती कोसळली. सुरुवातीला तिला जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, जिथे तिला थ्रॉम्बोलायसिस उपचार देण्यात आला, परंतु तिची स्थिती सुधारली नाही. त्यानंतर तिला तातडीने वोक्हार्ट हॉस्पिटल्स, मीरा रोड येथे हलविण्यात आले.

तपासणीत राइट सुप्राक्लिनॉइड इंटरनल कॅरोटिड आर्टरी (ICA) मध्ये मोठा रक्ताचा थक्का पूर्णपणे अडथळा निर्माण करत असल्याचे निदर्शनास आले – ही रक्तवाहिनी मेंदूच्या उजव्या भागाला रक्तपुरवठा करते. स्थितीची गंभीरता ओळखून डॉ. पवन पै यांनी तत्काळ हस्तक्षेप केला. सकाळी ७ वाजता रुग्णाला कॅथ लॅब मध्ये नेऊन डिजिटल सब्स्ट्रॅक्शन अँजिओग्राफी (DSA) आणि मेकॅनिकल थ्रॉम्बेक्टॉमी प्रक्रिया करण्यात आली. फक्त तीन प्रयत्नांत रक्ताचा थक्का यशस्वीरित्या काढण्यात आला आणि सकाळी ८:४५ वाजता मेंदूकडे पूर्ण रक्तप्रवाह पुन्हा सुरू झाला. या तातडीच्या उपचारामुळे कायमस्वरूपी मेंदूचे नुकसान टळले आणि वेळेवर केलेल्या न्युरो-इंटरव्हेन्शनचे महत्त्व अधोरेखित झाले.

प्रक्रियेनंतर रुग्णामध्ये जलद सुधारणा दिसून आली. काही तासांतच डाव्या बाजूची हालचाल सुधारू लागली आणि दुसऱ्या दिवशी ती पुन्हा हालचाल करू शकली. संपूर्ण हृदय व इतर तपासणीत कोणताही दुसरा धोका आढळला नाही, त्यामुळे डिहायड्रेशनच या स्ट्रोकचे प्रमुख कारण असल्याचे निश्चित झाले. एका आठवड्यात ती चालण्याच्या स्थितीत डिस्चार्ज करण्यात आली.

या प्रकरणाबाबत डॉ. पवन पै म्हणाले,

> डिहायड्रेशन कोणत्याही कारणाने – धार्मिक उपवास, दीर्घकाळ व्यायाम किंवा अनियंत्रित इंटरमिटंट फास्टिंग – रक्त घट्ट होण्यास कारणीभूत ठरू शकते आणि त्यामुळे स्ट्रोकचा धोका वाढतो. पुरेसे पाणी पिणे आणि स्ट्रोकची सुरुवातीची लक्षणे ओळखणे अत्यावश्यक आहे. वेळेवर मेकॅनिकल थ्रॉम्बेक्टॉमी केल्यास आजीवन अपंगत्व टाळून पूर्ण बरे होणे शक्य आहे.

हे प्रकरण जागरूकता, पाण्याचे योग्य सेवन आणि वेळेवर वैद्यकीय हस्तक्षेप यांचे महत्त्व अधोरेखित करणारा ठोस संदेश देते.

अत्याचाराची तक्रार मागे घेण्यासाठी महिलेकडे तगादा

संतापात आरोपीचा वस्त्र्याने गळा चिरला

नागपूर ,

त्याने तिच्यावर बलात्कार केला. त्याच्या त्रासाला कंटाळून तिने पोलिसांत तक्रार केली. नंतर तो ही तक्रार मागे घेण्यासाठी तिच्या मागे लागला. परत रोज त्रास देऊ लागला. एक दिवस रागाच्या भरात तिने त्याचे गळाच चिरला. सत्र न्यायालयाने तिला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. पण उच्च न्यायालयाने तिची शिक्षा कमी केली. भादंवि कलम ३०२चा हत्येचा गुन्हा भादंवि कलम ३०४ (२) म्हणजे हत्या करण्याचा हेतू नसताना राग, चिड किंवा अचानक परिस्थितीत केलेल्या कृतीमुळे एखाद्याचा मृत्यू होणे या गुन्ह्यात रुपांतरित केला व महिलेची जन्मठेप रद्द करीत तिला १० वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली.

न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फालके आणि न्यायमूर्ती नंदेश देशपांडे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. त्यामुळे आता या महिलेला १० वर्षांचा कठोर कारावास आणि ५ हजार रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. दंड न भरल्यास तीन महिन्यांचा अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असा आदेश देण्यात आला आहे. ही घटना वाशिम जिल्ह्यातील असून २००४ घडली होती. दोषी महिलेवर मृतक मधाओ गोते याच्या हत्येचा आरोप होता. त्यापूर्वी या महिलेने गोतेवर बलात्काराचा आरोप केला होता. त्या प्रकरणी वाशिम न्यायालयात खटला सुरू होती. मात्र मृतक गोते महिलेवर वारंवार खटला मागे घेण्यासाठी दबाव टाकत होता. २२ जून २००४च्या रात्री तो पुन्हा तिच्या घरी गेला आणि पुन्हा दबाव आणू लागला. संतापाच्या भरात महिलेनं उस्त्र्याने त्याचा गळा चिरला आणि खलबत्त्याने डोक्यावर वार केला, ज्यामुळे त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून तपासाअंती महिलेवर आरोपपत्र दाखल केले. सत्र न्यायालयाने तिला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

या शिक्षेला तिने त्याला उच्च न्यायालयात आव्हान दिले. बचाव पक्षाने सांगितले की, मुळात या घटनेची माहिती तिने स्वतः पोलिसांना दिली, असे पोलिसांचे म्हणणे आहे. हत्येचा हा कबुलीजबाब तिने पोलिसांसमोर दिल्याने तो कायदेशीर पुरावा मानता येत नाही. साक्षीदारांच्या अनेक बयाणांमध्ये विरोधाभास आहे. त्यामुळे महिलेला खून करण्याचा हेतू होता, हे सिद्ध होत नाही. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून न्यायालयाने निरीक्षण नोंदविले की, मृतकाच्या वर्तनामुळे महिलेला प्रचंड संताप आला होता. तिचा उद्देश खून करणे नव्हता, मात्र तिच्या कृतीमुळे मृत्यू होऊ शकतो, हे तिला ठाऊक होते. त्यामुळे हे कृत्य भादंवि कलम ३०४ (२) म्हणजेच खून करण्याचा हेतू नसताना राग, चिड किंवा अचानक परिस्थितीत केलेल्या कृतीमुळे एखाद्याचा मृत्यू होणे या प्रकारात मोडते, असे न्यायालयाने नमूद केले. अखेर न्यायालयाने तिच्या शिक्षेत कपात केली.

२९ वर्षीय तरुणीवर लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार

कल्याणमध्ये एका २९ वर्षीय तरुणीवर लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आरोपी प्रियकराने केवळ अत्याचारच केला नाही, तर पीडित तरुणीचा मोबाईल हॅक करून तिच्यावर पाळत ठेवली आणि तिचे अश्लील व्हिडीओ बनवले. एवढंच नाही तर तरुणीच्या कुटुंबीयांनाही धमक्या देत ब्लॅकमेल केल्याचं समोर आलं आहे. मोबाईलमध्ये साठवलेले अश्लील व्हिडिओ पोलिसांच्या हाती लागल्यानंतर संपूर्ण प्रकरणाचा पर्दाफाश झाला आहे. विनीत गायकर असे या आरोपी प्रियकराचे नाव असून कल्याण खडकपाडा पोलिस ठाण्यात त्याच्या विरोधात गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात भीषण अपघातांचा थरार सुरुच...

२ दिवसात ५ जण ठार, दिवाळीत कुटुंबांवर पसरली शोककळा

मुंबई ,

गेल्या दोन दिवसात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी विविध अपघात झाले आहे. या अपघातांमध्ये एकूण ५ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर १३ जण जखमी झाले आहेत. त्यातच आता नुकतंच मुंबई-हैदराबाद महामार्गावर उमरगा तालुक्यातील डाळिंब या ठिकाणी भीषण अपघात झाला आहे. या अपघातात ४ जण जागीच ठार झाले. तर अन्य ठिकाणी एका युवतीचा अपघाती मृत्यू झाला आहे. त्यामुळे दिवाळीत काही कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

धाराशिवमध्ये अपघात

मुंबई-हैदराबाद महामार्गावर उमरगा तालुक्यातील डाळिंब येथील साईप्रसाद पेट्रोल पंपाजवळ मोठा अपघात झाला. यावेळा सफारी आणि ग्रँड विटारा या चार चाकी गाड्यांमध्ये भीषण अपघात झाला. हैदराबादकडे जाणारी ग्रँड विटारा आणि सोलापूरच्या दिशेने जाणारी सफारी गाडी यांची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातामध्ये ग्रँड विटारा गाडीतील चार जणांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य दोघे गंभीर जखमी आहेत. चालकांच्या हलगर्जीपणामुळे हा अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे.

वाशिममध्ये सात जण जखमी

वाशिमच्या रिसोड-हिंगोली मार्गावर मुंगसाजी नगरजवळ पिकअप आणि लक्झरी वाहनाची जोरदार धडक होऊन सात जण जखमी झाले आहेत. हे सर्व जखमी हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील शेतकरी आहेत. झेंडूची फुले विकून ते आपल्या गावी परतत असताना अपघात झाला. जखमींना तातडीने रिसोड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांना पुढील उपचारांसाठी वाशिम येथे रेफर करण्यात आले आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला आहे. इगतपुरी येथे मुंबई-नाशिक महामार्गावर वाडीवऱ्हे फाट्याजवळ पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाला. विरुद्ध दिशेने येणाऱ्या कारने समोरून येणाऱ्या आयशरला जोरदार धडक दिली. धडकेनंतर कार शेतात घुसली. या अपघातात कारमधील तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना पुढील उपचारांसाठी नाशिक येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

लग्नाची पत्रिका देण्यासाठी गेलेल्या तरुणीचा मृत्यू

सिंधुदुर्गमधील फोंडाघाट गांगोवाडी येथील निकिता सावंत ही युवती आपल्या लग्नाची पत्रिका देण्यासाठी मुंबईहून गावाकडे आली होती. सकाळी आपल्या सख्या भावासोबत मामाकडे पत्रिका देऊन परत येत असताना बस आणि दुचाकीच्या दुर्दैवी अपघातात तिचा मृत्यू झाला. येत्या ३ फेब्रुवारीला निकिताचे लग्न होणार होते. तर रत्नागिरी-गुहागर चिपळूण मार्गावर मच्छी वाहतूक करणारा टेम्पो उलटला. गुहागर-चिखली मार्गावर झालेल्या या अपघातात टेम्पोचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच या अपघातामुळे रस्त्यावर मच्छी पसरल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले. टेम्पोचा क्लीनर किरकोळ जखमी झाला आहे.

तीन जनावरांना धडक

बीड तालुक्यातील येळंब घाट येथील अहिल्यानगर-अहमदपूर रस्त्यावर सकाळी ८ वाजता एसटी बसने मागून आलेल्या ट्रकला धडक दिली आहे. या बसने रस्त्याखाली चालणाऱ्या दुचाकीसह तीन जनावरांना धडक दिली. यात दुचाकीस्वार अक्षय ढाणे गंभीर जखमी झाले, तर एक गाय दगावली.

पुण्यातील भोरमधील नसरापूर जवळील शिवगंगा नदीवरील पुलाजवळ रस्त्याच्या दुरावस्थेमुळे टेम्पो पलटी होऊन अपघात झाला. वेल्ह्याहून पुण्याच्या मार्केटमध्ये फुलं आणि भाजीपाला घेऊन निघालेला असताना, रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये आपटून हा टेम्पो पलटी झाला. यात सुदैवाने जीवितहानी झाली नाही.



स्वत:च्या ९ वर्षाच्या लेकीला दाखवले 'तसले' व्हिडिओ अन्...; नवी मुंबईत पित्याचं विकृत रुप समोर



नवी मुंबई,

मुंबईतील कोपरखैरणे येथे एका धक्कादायक घटनेत एका पित्याने आपल्या नऊ वर्षांच्या मुलीसोबत लैंगिक आणि अश्लील चाळे केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कोपरखैरणे पोलिसांनी या नराधमाविरोधात विनयभंगासह पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून, त्याचा शोध सुरू आहे. आरोपी हा पीडित मुलीच्या आईसोबत राहत असताना, त्याने मुलीला मोबाइलवर अश्लील व्हिडिओ दाखवून तिच्यासोबत गैरवर्तन केले. हा प्रकार मुलीच्या आईच्या लक्षात येताच तिने तातडीने कोपरखैरणे पोलीस ठाण्यात धाव घेतली.पीडित मुलीची आई मूकबधिर असल्याने पोलिसांनी तज्ज्ञांच्या मदतीने तिच्याशी संवाद साधून हा गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने आपल्याच मुलीला अश्लील व्हिडिओ दाखवून तिच्यासोबत चुकीच्या पद्धतीने वागला. पीडित मुलीच्या आईने धाडस दाखवत पोलिसांना माहिती दिली. आई मूकबधिर असल्याने संवाद साधणे थोडे कठीण होते, पण पोलिसांनी तज्ज्ञांची मदत घेऊन तिच्याकडून संपूर्ण माहिती घेतली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीविरोधात गंभीर गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोक्सो कायदा हा लहान मुलांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी बनवला गेला आहे.

या महिलेने असाही आरोप केला आहे की आरोपीने यापूर्वी तिच्यावर शारीरिक हल्ला केला होता आणि छळ केला होता. ''आम्ही आरोपीवर लक्ष ठेवून आहोत आणि पुढील तपास सुरू आहे,'' असे कोपरखैरणे पोलिस ठाण्यातील एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. दरम्यान, एका वेगळ्या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहे, ज्यात एक महिला रस्त्यावर एका पुरूषाला चप्पलने मारताना दिसत आहे.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

विविध

२

मुंबई, मंगळवार, २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५



दुधामुळे खरंच वजन वाढतं का...?

दुधात कॅल्शिअम आणि प्रोटीन भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळेच दुधाला पौष्टिक आहाराचा महत्वपूर्ण भाग मानलं जातं. दुधातील कॅल्शिअममुळे हाडे आणि दातांना मजबूती मिळते. तर प्रोटीनमुळे मांसपेशींची निर्मिती आणि त्यांना मजबूती मिळते. त्यामुळेच लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना दूध दिलं जातं. पण अनेकजण वजन कमी करण्यासाठी डायटिंग करतात आणि दुधाचं सेवन बंद करतात. मात्र, वजन कमी करण्यासाठी दुधाचं सेवन बंद करणं फायदेशीर ठरतं का? या प्रश्नाचं उत्तर जाणून घेऊ....

अनेकांचा हा समज आहे की, दुधाचं सेवन केल्याने वजन वाढतं. मुळात मलाई असलेल्या दुधाचं सेवन केल्याने तुमचं वजन नक्कीच वाढू शकतं. पण टोन्ड आणि डबल टोन्ड दूध हे वजन कमी करण्यास फायदेशीर ठरतं.

दुधात किती कॅलरी असतात?

एक कप दुधात स्वाभाविक रूपाने १५० कॅलरी असतात, कारण यात नॅच्युरल शुगर आढळते. तेच बाजारात उपलब्ध फ्लेवर्ड दुधात एक्स्ट्रा शुगर असते, ज्यामुळे कॅलरींचं प्रमाणही अधिक वाढतं.

दूध आणि वजनाचं कनेक्शन

१) दूध हे प्रोटीनचं एक स्त्रोत आहे. आणि हे आपणा सर्वांनाच माहीत आहे की, प्रोटीन शरीराच्या आरोग्यासाठी किती आवश्यक आहे. याने भूकेचे हार्मोन्स रेग्युलराइज करण्याचं काम केलं जातं. प्रोटीनमुळे पोट भरलेलं राहतं आणि तुम्हाला भूक कमी लागते.

२) दात आणि हाडांच्या मजबूती सोबतच कॅल्शिअम वजन कमी करण्यासही मदत करतं. वेगवेगळ्या रिसर्चनुसार, कॅल्शिअम आणि व्हिटॅमिन डी पचनक्रिया सुधारून शरीराला कॅलरी बर्न करण्यास मदत करतं.

३) दुधात व्हिटॅमिन बी ३ चं अधिक प्रमाण तुम्हाला वजन नियंत्रित ठेवण्यात आणि ऊर्जा कायम ठेवण्यात मदत करतं.

४) प्रोटीन पचनाला अधिक वेळ लागतो आणि याने तृप्तीची, संतुष्टीची भावना निर्माण होते. जेव्हा तुमचं पोट भरलेलं राहतं, तेव्हा तुम्ही जंक फूडचं सेवन कमी करता.

५) नुकत्याच करण्यात आलेल्या रिसर्चमधून समोर येतं की, दुधात लिनोलेनिक ॲसिड असतं, जे कॅलरी बर्न करण्यात मदत करतं.

दूध आणि वजन वाढणं

दुधाने वजन तेव्हाच वाढतं जेव्हा तुमच्या आहारातून अतिरिक्त कॅलरी घेतल्या जातील. जर दुधाने तुमचं वजन वाढत असेल तर याचा अर्थ हा होतो की, तुम्ही तुमच्या आहारातून भरपूर प्रमाणात कॅलरीचं सेवन करत आहात. दुधामुळे वजन वाढत नाही.

काय आहे सत्य?

दूध किंवा इतर डेअरी उत्पादने सेवन केल्याने कोणताही समस्या होत नाही. पण वजन कमी करण्यासाठी तुम्ही कमी कॅलरी असलेल्या दुधाचं सेवन करावं. १ कप लो कॅलरी दुधात केवळ ८६ कॅलरी असतात. फ्लेवर्ड दुधाऐवजी नेहमी शुगर नसलेल्या दुधाचं सेवन करावं.



चमकदार, सुंदर आणि मजबूत केसांसाठी लिंबाचा करा वापर

पावसाळ्यात जास्तीत जास्त लोकांना केसांच्या वेगवेगळ्या समस्यांचा सामना करावा लागतो. अनेकदा तर इतके कमजोर होतात की, मधून तुटूही लागतात. याचं कारण म्हणजे पावसाळ्यात केस भिजलेले राहणे आणि केसात कोंडात होणे. योग्य प्रमाणात सूर्यप्रकाश आणि हवा न मिळाल्याने केसात आरोग्य बिघडतं. जर तुम्हालाही ही समस्या होत असेल तर त्यासाठी आम्ही तुम्हाला एक सोपा घरगुती उपाय सांगत आहोत. तो उपाय म्हणजे लिंबू.

लिंबातील खास गुण फायदेशीर

लिंबू हे आरोग्यासाठी किती फायदेशीर असतं हे काही तुम्हाला वेगळं सांगायला नको. संक्रमणापासून बचाव करण्यासोबतच याने शरीराचं तापमान संतुलित ठेवण्यास मदत मिळते. शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी देखील डॉक्टर लिंबू पाणी सेवन करण्याचा सल्ला देतात. आरोग्यासोबतच लिंबू केसांसाठीही फायदेशीर ठरतं.

केसांसाठी कसं फायदेशीर?

लिंबाच्या रसात भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी असतात. याने डोक्यातली कोलेजनची निर्मिती वाढवून केसांचं आरोग्य चांगलं ठेवता येतं. तेच यातील ॲसिडमुळे डोक्याच्या त्वचेची चांगली स्वच्छताही होते आणि केसही मजबूत होतात. लिंबात सायट्रिक ॲसिड, मॅग्नेशिअम, कॅल्शिअम आमि फ्लानोएड तत्वही असतात. हे तत्व केसांची चांगली वाढ करतात. लिंबाचा रस तुम्ही केसांवर आणि केसांच्या मुळात लावू शकता. सोबतच इतर वेगळ्या पद्धतीने सुद्धा तुम्ही लिंबाचा रस केसात लावू शकता.

ऑयली केसांसाठी

जर तुमचे केस ऑयली असतील तर लिंबाचा रस केसांच्या मुळात लावा. यासाठी लिंबाचा रस एका वाटीत काढा आणि कापसाच्या मदतीने केसांच्या मुळात चांगल्याप्रकारे लावा. दोन मिनिटांसाठी हलक्या हाताने मसाज करा. १० मिनिटांनी केस शॅम्पूने धुवा. आठवड्यातून एकदा हा उपाय करा.

ड्राय केसांसाठी

ड्राय केसांसाठी वेगळ्या पद्धतीने लिंबाचा वापर करावा लागतो. ड्राय केस हे लवकर गळतात, त्यामुळे त्यांची काळजी घेताना काही गोष्टी ध्यानात घ्याव्या लागतात. यासाठी अर्ध्या लिंबाच्या रसात १ मोठा चमचा खोबऱ्याचं तेल किंवा ॲलोव्हेरा जेल मिश्रित करा. हे केसांना लावा आणि १० मिनिटांने केस स्वच्छ करा. तुम्हाला हवं असेल तर यात तुम्ही मधही मिश्रित करू शकता.

रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी गर्भवतींनी फॉलो करा या ७ टिप्स

गर्भावस्था म्हणजे स्त्रीच्या आयुष्यातील अतिशय सुंदर आणि सृजनशील काळ. परंतु ही अवस्था एका अर्थाने नाजूकच असते. कारण या अवस्थेत रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. त्यामुळे विशेष काळजी घेणे गरजेचे असते. सध्या पसरलेल्या कोरोना साथीच्या काळात तर गर्भिणींनी स्वतःची विशेष काळजी घेणे. हे त्यांच्या आरोग्यासाठी आणि गर्भाच्या वाढीसाठी क्रमप्राप्त आहे. गर्भवती महिलांनी योग्य पद्धतीनं स्वतःची काळजी घेतली तर करोना व्हायरस त्यांना स्पर्श देखील करणार नाही. कोणतेही अन्नपदार्थ खाण्यापूर्वी किंवा चेहऱ्याला स्पर्श करण्यापूर्वी हात स्वच्छ धुणे गरजेचं आहे. शिंकणाऱ्या तसंच खोकणाऱ्या व्यक्तींच्या संपर्कात येणे कटाक्षानं टाळायचं आहे. आहार, विहार आणि विश्रांती यांच्याशी संदर्भात गर्भवती महिलांनी कशी काळजी घ्यायची आहे याबाबत डॉ. शर्वरी अभ्यंकर यांनी काही महत्त्वाच्या टिप्स दिल्या आहेत.

रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी

गर्भवती महिलांनी रोजच्या आहारात आवळा किंवा त्यापासून बनवलेले पदार्थ जसे मोरावळा, आवळा कँडी यांचा समावेश करावा. आवळा 'व्हिटॅमिन सी' युक्त आहे तसेच रक्त वाढीसाठी सुद्धा उपयोगी आहे. ज्याची गर्भारपणात नितांत आवश्यकता असते. आवळ्याच्या सेवनामुळे गरोदरपणात होणाऱ्या उलट्या सुद्धा कमी होतात. सकाळी उठल्यानंतर आणि रात्री झोपण्यापूर्वी गरम पाण्यात मीठ आणि हळद घालून गुळण्या कराव्यात. गरोदरपणात चहा तसा कमीच घ्यावा आणि जेव्हा घ्याल तेव्हा तो थोडंसं आलं किंवा सुंठ आणि गवती चहा युक्त असावा.

गरम अन्नपदार्थांचं करा सेवन

सध्या लॉकडाउन असल्यामुळे घरातल्याच अन्नपदार्थांचं सेवन केले जात असेल. पण शक्यतो ते नेहमी गरम-गरम आणि ताजं जेवावं. गरोदरपणात बऱ्याचदा उलट्या होत असल्यामुळे थंड पदार्थ खायची खूप इच्छा होते. पण सध्याची करोना व्हायरसची साथ पाहता थंड पाणी, थंड सरबत, आईस्क्रीम, मिल्क शेक हे पदार्थ पूर्ण पणे टाळावेत. आम्लपित्ताचा त्रास होत असेल तर साध्या पाण्यातून कोकम सरबत घ्यावे. डोहाळ्यांच्या नावाखाली अति तिखट आणि आंबट पदार्थ खाऊ नयेत.

सर्दी-खोकल्यापासून असं राहा दूर

रोज घरचं गोड ताजं ताक थोडंसं हिंग आणि जिरे पूड घालून प्यावे. ज्यांना सर्दीचा त्रास आहे त्यांनी रात्री ताक पिऊ नये. दुधात शतावरी कल्प घालून प्यावं. ब्रेड, बिस्कीट यांसारखे बेकरी पदार्थ बेतानेच खावेत. मधल्या वेळेस भूक लागल्यास राजगिरा चिक्की, मुगाचे लाडू, लाह्यांचा कमी तिखट, कमी तेलकट चिवडा अशा गोष्टी पसंद कराव्यात. करोना व्हायरस हा मुख्यत्वे श्वासवाह संस्थानांवर हल्ला करत आहे. त्यामुळे सर्दी-खोकला, घसा दुखी होणार नाही याची काळजी घ्यावी.

योगासने शिका

हे झालं आहाराबाबत आता गर्भिणीचा विहार पाहूया. सध्या सगळीकडे लॉकडाउन असल्यामुळे बाहेर पडणं शक्य नाही. गर्भिणींनी महत्त्वाच्या कामा खेरीज (उदा. वैद्यकीय तपासणी, इत्यादी) अजिबात घराबाहेर पडू नये. भाजी, किराणा आणणे यांसारखी कामं घरातल्या इतरांनी करावीत. घरच्या घरी एखाद्या प्रशिक्षित योग शिक्षकाकडून आसन आणि प्राणायाम शिकून घ्यावेत. (हल्ली ऑनलाईन योग प्रशिक्षणचा पर्याय उपलब्ध आहे) पर्वतासन, गोमुखासन, ताडासन, सुलभ उष्ट्रासन इत्यादी सारखी आसन फुप्फुसांची कार्यशक्ती वाढवण्यात छान मदत करतात. ज्याची सध्याच्या कोरोना साथीच्या दिवसात आवश्यकता आहे. उदर श्वसन, अनुलोम विलोम, भ्रामरी प्राणायाम यांचा विशेष सराव करावा.

वर्क फ्रॉम होम करताना घ्या ही काळजी

ज्या गरोदर स्त्रिया वर्क फ्रॉम होम करत आहेत, त्यांनी दर एक तासानंतर खुर्चीवरून उठावे आणि घरातल्या घरात एक फेरी मारावी. हात, पाय, खांदे आणि मान यांचं थोडं स्ट्रेचिंग करावं. यामुळे रक्ताभिसरण प्रक्रिया उत्तम राहते आणि शरीरावरील सूज जी गर्भावस्थेत बऱ्याचदा असते ती कमी होते. जर सतत कम्प्युटरसमोर बसून काम करायचे असेल तर दर ४ तासांनी हात साबणाने स्वच्छ धुऊन डोळ्यावर थंड पाण्याचे हबकारे मारावे. दोन्ही तळहात एकमेकांवर घासून थोडेसे गरम करून ते डोळ्यांवर ठेवावेत. यामुळे डोळ्यांवर आलेला ताण नाहीसा होतो.

३ पोटातील बाळावरही होतात परिणाम

रोज दोन्ही वेळच्या जेवणानंतर घरातल्या बाल्कनी मध्ये किंवा गच्ची मध्ये शतपावली करावी. दिवसातून एकदा अंगावर कोवळी उन्हं घ्यावी. उन्हामुळे व्हिटॅमिन डी तर मिळतेच पण मानसिक स्वास्थ्यासाठी सुद्धा ते आवश्यक आहे. आता मानसिक स्वास्थ्याचा विषय निघालाच आहे तर गर्भारपणी त्याची काळजी कशी घ्यावी ते पण पाहूया. मातेच्या मानसिक स्थितीचा आणि गर्भाचा अतिशय जवळचा संबंध आहे. मातेच्या विचारांतील सूक्ष्म बदलसुद्धा गर्भ अचूक टिपत असतो. जर माता आनंदी असेल तर गर्भ पण आनंदी होतो आणि माता दुःखी, तणावपूर्ण असेल तर गर्भ सुद्धा त्याचा अनुभव घेतो. मातेच्या मनातले हे सारे बदल गभार्ला मातेच्या हृदय स्पंदनांमुळे जाणवतात. यासाठी गर्भाच्या उत्तम वाढीसाठी मातेने आपले मानसिक आरोग्य हे शारीरिक आरोग्याएवढेच जपले पाहिजे.



वेळेचा सदुपयोग करा

चहुबाजूंनी सध्या केवळ करोना व्हायरसशी संदर्भातीलच घडामोडी कानावर येत आहेत. त्यामुळे डिप्रेशन येणे साहजिक आहे. गर्भिणींनी या सगळ्यापासून चार हात दूर राहणे केव्हाही चांगले. या लॉकडाउनच्या काळात कधी नव्हे तो इतका वेळ हाताशी मिळत आहे. त्याचा काहीतरी छान, प्रेरणादायी कथा वाचण्यासाठी उपयोग करा. रोज एखादा गीतेचा अध्याय, रामरक्षा यांचं पठण करा. आपल्या इष्ट देवतेचं स्तोत्र म्हणा. यामुळे गर्भावरही चांगले संस्कार होतात आणि मातेचे मानसिक आरोग्यही जपले जाते. करोना व्हायरसचं संकट खूप मोठं आहे. हे खरंच पण आहार विहाराच्या नियमांचे काटेकोर पालन केल्यास आपण अशा परिस्थितीत सुद्धा आपले शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य उत्तम ठेवू शकतो.

आतड्यांमधील जमलेली घाण झपाट्याने काढून टाकतील 'हे' ज्यूस?

अन्नातून शरीराला ऊर्जा मिळते आणि अन्नातून पोषक तत्वे शोषून घेण्यात पचनसंस्था महत्त्वाची भूमिका बजावते. पचनक्रिया सुरळीत राहणे अत्यंत आवश्यक आहे. कोलन, ज्याला मोठे आतडे देखील म्हणतात, हा पाचन तंत्राचा एक महत्त्वाचा भाग आहे. योग्य पचनासाठी मोठ्या आतड्याचे निरोगी असणे आवश्यक आहे. शरीराचा हा अंतर्गत भाग स्वच्छ ठेवणे आणि रोगांपासून संरक्षण करणे खूप महत्वाचे आहे. ज्याप्रमाणे शरीराच्या बाहेरील भाग स्वच्छ करणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे शरीराच्या आतील भागाची स्वच्छता करणे आवश्यक आहे.

भारतीय योगगुरू, लेखिका, संशोधक आणि टीव्ही व्यक्तिमत्त्व डॉ. हंसा योगेंद्र यांच्या मते, मोठ्या आतड्याची स्वच्छता करणे म्हणजे त्यातून टॉक्सिन आणि काढून टाकणे. अनेक संशोधनात हे समोर आले आहे की मोठे आतडे स्वच्छ ठेवल्याने पचनक्रिया व्यवस्थित राहते आणि कोलन कॅन्सरचा धोकाही कमी होतो. आता प्रश्न पडतो की आतडे स्वच्छ करण्यासाठी काय करावे.

आतडे साफ करणे म्हणजे आहारात अशा पदार्थांचे सेवन करणे, ज्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकले जातील आणि शरीरही निरोगी राहतील. हेल्थलाइनच्या मते, काही ज्यूसचे सेवन आतडे स्वच्छ करण्यासाठी खूप प्रभावी असल्याचे सिद्ध होते. हा रस प्यायल्याने बद्धकोष्ठता दूर होते आणि पचनक्रिया निरोगी राहते. मोठे आतडे स्वच्छ करण्यासाठी कोणते ज्यूस सेवन करावे ते जाणून घेऊया.

सफरचंदाचा रस प्यायल्याने आतडे निरोगी राहतील

सफरचंदाचे सेवन आरोग्यासाठी जितके फायदेशीर आहे, तितकाच त्याचा रस देखील फायदेशीर आहे. हेल्थलाइनच्या वृत्तानुसार, सफरचंदाच्या रसाचे सेवन केल्याने पोट साफ होण्यास मदत होते. पोटात साचलेली घाण आणि विषद्रव्ये मलमार्गे शरीरातून बाहेर पडतात. सफरचंदाचा रस आतडे डिटॉक्ससाठी खूप फायदेशीर आहे.



भाज्यांचा रस प्या, आतडे स्वच्छ होतील

आतड्यांच्या आरोग्यासाठी भाज्यांचे रस सेवन करा. भाज्यांच्या ज्यूसमध्ये पालक, टोमॅटो, गाजर, फ्लॉवर, ब्रोकोली आणि कारल्याचा रस घ्या. हे रस शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकतात आणि कोलन स्वच्छ करतात. हे रस तुम्ही सकाळी रिकाम्या पोटी सेवन करू शकता.

पाण्यात मीठ मिसळून प्या

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, मीठ मिसळलेले पाणी प्यायल्याने आतडे चांगल्या प्रकारे स्वच्छ होतात. २०१० च्या अभ्यासात असे आढळून आले आहे की मीठ मिसळलेले पाणी पिण्याने आतडे स्वच्छ होण्यास मदत होते. एक ग्लास कोमट पाण्यात दोन चमचे मीठ मिसळून ते सेवन करा, आतड्यांची स्वच्छता चांगली होईल. हे पाणी हळूहळू सेवन करा.

लिंबाचा रस सेवन करा

लिंबाचा रस, व्हिटॅमिन सी समृद्ध, आम्लता दूर करते आणि पचन सुधारते. हा रस पोटात लपलेले हानिकारक बॅक्टेरिया मारते. याचे सेवन केल्याने आतडे चांगल्या प्रकारे स्वच्छ होतात.

जड वस्तू उचलताना कधीही बेंबी सरकू शकते; 'या' ३ उपायांनी वेदनेपासून आराम मिळवा

बेंबी सरकणे ही एक अशी समस्या आहे जी कोणालाही कधीही त्रास देऊ शकते. बेंबी सरकली की पोटात दुखते, उलट्या, मळमळ, जुलाब, पचनक्रियेत गडबड यासारख्या समस्या होतात. या समस्येमुळे उठणे-बसणेही कठीण होते. बेंबी सरकण्याची समस्या कोणालाही कधीही होऊ शकते. जड वजन उचलणे, अचानक वाकणे, पायऱ्या चढताना आणि उतरताना स्नायूंना ताण पडणे, जास्त मसालेदार अन्न खाल्ल्याने अशी अनेक कारणे या समस्येची असू शकतात. एका पायावर बराच वेळ उभे राहूनही अनेक वेळा बेंबी सरकते. बेंबी सरकण्याची ही समस्या काही लोकांना पुन्हा पुन्हा सतावते. जेव्हा ही समस्या उद्भवते तेव्हा बेंबी एकतर वर सरकते किंवा खाली सरकते. योगगुरू बाबा रामदेव यांच्या मते, जर बेंबी वरच्या दिशेने सरकली तर बद्धकोष्ठतेचा त्रास होतो आणि जर ती खाली सरकली तर जुलाबाचा त्रास होतो. बेंबी उजवीकडे आणि डावीकडे सरकल्यास संपूर्ण शरीराचे संतुलन बिघडू लागते. योग गुरूच्या मते, जर बेंबी सरकण्याची समस्या असेल तर काही घरगुती उपायांनी ती सहज दूर होऊ शकते. चला जाणून घेऊया घरी उपचार कसा करावा.

बेंबीवर पिठाचा दिवा ठेवावा – पिठाचा दिवा बनवून त्यात थोडे तेल टाकून तो दिवा बेंबीवर ठेवावा आणि त्यावर एक लहान वाटी उलटी करून ठेवावी. दिवा झाकून ठेवल्याने तो बेंबीला चिकटलेला दिसेल. काही वेळाने, जर बेंबी त्याच्या जागी आल्यास, वाटी दिव्यातून सहज बाहेर पडेल. दिव्यात ऑक्सिजन जेवढा जास्त वेळ राहील, तेवढा दिवा जळत राहील, नंतर त्यात पोकळी निर्माण होते, त्यामुळे पोट खेचले जाते आणि नाभी त्याच्या जागी येते.

उत्तनपादासन करा, बेंबीची समस्या लवकर बरी होईल – उत्तानपादासन करण्यासाठी पाय वर केले जातात. याचा नियमित सराव केल्याने शरीराला अनेक फायदे होतात. बेंबी सरकण्याच्या समस्येमध्ये या आसनाचा खूप फायदा होतो. नाभीचे संतुलन राखण्यासाठी हे आसन खूप प्रभावी ठरते. असे केल्याने बद्धकोष्ठता दूर होते, पोटदुखी दूर होते आणि बेंबी सरकल्याने होणारी सर्व लक्षणे दूर होतात. हे आसन दिवसातून दोनदा केल्याने तुमची बेंबी बरी होईल.

पवनमुक्तासन करा – ज्या लोकांना बेंबी सरकल्याने पाठदुखी आणि पोटदुखीच्या तक्रारी आहेत त्यांनी पवनमुक्तासन करावे. हे आसन केल्याने बद्धकोष्ठता आणि पोटदुखीची समस्या दूर होते. असे केल्याने मणक्याची लवचिकता वाढते. बेंबी सारकल्याने तुम्हाला त्रास होत असेल, तर त्यासाठी उत्तम उपाय म्हणजे योग.

बोधकथा

खोड मोडली

तुकाराम नावाचा एक मीठाचा व्यापारी होता. त्याच्याजवळ एक गाढव होते. ते फार आळशी होते. रोज सकाळी तुकाराम गाढवाच्या पाठीवर मीठाच्या पिशव्या लादत असे. मग तो गाढवाला घेऊन शेजारच्या गावात मीठ विकायला जात असे. जाताना एक ओढा लागत असे. एके दिवशी ओढा ओलांडत असताना गाढवाचा पाय अचानक घसरला व ते पाण्यात पडले. त्यामुळे त्याच्या पाठीवरचे मीठाचे पोते पाण्यात भिजले. त्यातील मीठ विरघळल्याने ते हलके झाले. त्यामुळे गाढवाचे ओझे कमी झाले. त्याला चांगलाच आराम मिळाला. दुसऱ्या दिवशी गाढवाने मुद्दाम पाण्यात पडल्याचे नाटक केले. मीठ पुन्हा पाण्यात भिजल्याने त्यादिवशीही गाढवाला आराम मिळाला. मग तो सारखेच असे करू लागला.



पण लवकरच तुकारामला ही युक्ती लक्षात आली. त्याची खोड मोडण्यासाठी मग त्याने एके दिवशी त्याच्या पाठीवर कापसाचे ओझे ठेवले.

ओढा लागताच गाढवाने पुन्हा पडल्याचे नाटक केले. मात्र, या वेळी पाटीवर मीठाऐवजी कापूस असल्याने तो भिजल्यावर चांगलाच जड झाला. त्यामुळे गाढवाला लवकर उठता येईना. त्याला त्या दिवशी अधिकच ओझे वाहावे लागले. त्याला चांगलीच अद्दल घडली. तेव्हापासून गाढवाने कधीच पाण्यात पडल्याचे नाटक केले नाही व कामचुकारपणा केला नाही.

तात्पर्य : कामातून पळवाट शोधणे केव्हाही वाईट.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५

संपादकीय

कोकणचा कॅलिफोर्निया होतोय की केनिया?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



निसर्गसंपन्न प्रदेश म्हणून ओळख असणाऱ्या कोकणचा विकास हा कॅलिफोर्नियाप्रमाणे होणार असल्याच्या वल्गना गेल्या अनेक वर्षांपासून राजकारण्यांकडून केल्या जात आहेत. परंतु, कोकणच्या विकासाची सद्यपरिस्थिती पाहता त्याची वाटचाल ही कॅलिफोर्नियाच्या दिशेने होत आहे की केनियाच्या दिशेने, हा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही. विविध विकास प्रकल्पांची वर्षानुवर्षे होणारी रखडपट्टी पाहता कोकणची वाटचाल ही प्रगतीच्या दिशेने नाही तर ती अधोगतीच्या दिशेनेच अधिक होत असल्याचा कटू अनुभव अनेकांना येत आहे.

स्वर्गापेक्षा सुंदर आसा, आमचो ह्यो कोकण असे कोकणवासीय नेहमी अभिमानाने सांगतात. निसर्गसंपन्न प्रदेश असणाऱ्या कोकणचो रुबाब भारी, तोरो भारी असे वर्णन केले जाते. ज्या प्रदेशाची तुलना ही स्वर्गाप्रमाणे सुंदर अशी केली जाते त्याचा विकासही उत्तमरित्या होणे अपेक्षित आहे. परंतु, दुर्दैव हे की येथे एकही विकास प्रकल्प यशस्वीरित्या राबविला गेल्याचा अनुभव कोकणवासीयांच्या गाठीशी नाही. मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाची १४ वर्षांची रखडपट्टी, कोकण रेल्वेचे विद्युतीकरण केवळ काही टप्प्यांतच झाले आहे. अद्याप ते पूर्ण झालेले नाही. कोकण रेल्वेच्या दुपदरीकरणाचाही प्रश्न प्रलंबित आहे. आशिया खंडातील सर्वात मोठा तेल शुद्धीकरण (रिफायनरी) प्रकल्प कोकणात गेल्या १० वर्षांपूर्वी उभारण्याचे नियोजन होते. अद्याप यासाठी जागेची निश्चितीही झालेली नाही. पाटबंधारे प्रकल्प जवळपास गेल्या २५ वर्षांपासून रखडलेले आहेत. एन्रॉन असो वा दाभोळचा वीज प्रकल्प यातूनही ठोस असे काही कोकणच्या हाती लागलेले नाही. एकतर आधी प्रकल्प रखडले आणि पूर्ण झाले तरी त्यातून काही अपेक्षित असे कोकणवासीयांच्या हाती लागले नाही. त्यामुळे कोकणाची प्रगतीऐवजी अधोगतीच अधिक झाली. त्यामुळे खरेच कोकणचा कॅलिफोर्निया होणार की हेदेखील एक दिवास्वप्नच आहे, असे सध्याच्या घडीला अनेक कोकणवासीयांना वाटू लागले आहे.

कोणत्याही भागाचा विकास होण्यासाठी तेथे दर्जेदार रस्ते, मुबलक प्रमाणात वीज पुरवठा, गतिमान रेल्वे, विमानतळे तसेच अन्य महत्त्वाची दळणवळणांची साधने उपलब्ध असणे आवश्यक असतात. कोकणाचा इतिहास पाहता कोकणवासीयांना या सर्व गोष्टींसाठी अनेक वर्षांपासून प्रतीक्षा आणि संघर्ष करावा लागला आहे. ना येथे महामार्गाचे काम उत्तमरित्या झाले ना रेल्वेचे दुपदरीकरण पूर्ण झाले. चिपी येथे एकमेव विमानतळ आहे. परंतु, त्याचा उपयोग कोकणवासीयांना फारसा होत नाही. याउलट गोव्यातील मोपा विमानतळाचा कोकणवासीय उपयोग सर्वाधिक करतात. कोकणात रुग्णालयेही दर्जेदार नाहीत. अनेकजण उपचारांसाठी गोव्यातील रुग्णालयांमध्ये धाव घेतात. आवश्यक प्रमाणात वीज उपलब्ध नसल्याने, रस्ते तसेच वेगवान दळणवळणासाठीची साधने आवश्यक प्रमाणात नसल्याने अनेक उद्योग कोकणात आलेले नाहीत. कोकणात पाणी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे, मात्र तरीही वीजनिर्मितीकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष झालेले दिसते.

जगाच्या नकाशावर कोकणाला आपले प्रतिबिंब उमटविण्यासाठी मदत करणारा, येथील लाखो भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध करून देणारा आणि भारतातील इंधन आयात घटविण्यात सिंहाचा वाटा उचलणारा प्रकल्प म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून चर्चिला जाणारा कोकणातील तेलशुद्धीकरण (रिफायनरी) प्रकल्प अद्यापही येथे मार्गी लागू शकलेला नाही. जवळपास गेल्या दशकभराच्या काळापासून या प्रकल्पाची नुसती चर्चाच होत आहे. हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रत्यक्षात काम होत असल्याचे कुठेच जाणवत नाही. आतंरराष्ट्रीय दर्जाचा हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी जे प्रयत्न खरेतर व्हायला हवे होते ते न झाल्यामुळेच कदाचित हा प्रकल्प रखडला की काय, अशी शंका वाटू लागली आहे. हा प्रकल्प चर्चेतही राहिला तोही केवळ स्थानिक कोकणवासीयांच्या विरोधामुळे आणि रोषामुळेच. अन्यथा खरेतर ज्या आंतरराष्ट्रीय कितीर्चा हा प्रकल्प म्हणून या रिफायनरीच्या ख्यातीची जी चर्चा व्हायला हवी होती ती अधिक प्रमाणात न होता, यामुळे कोकणवासीयांचे नुकसान कसे अधिक होईल, याचभोवती चर्चेचा केंद्रबिंदू फिरत राहिला. त्यामुळे हा प्रकल्प जेव्हाही मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येतो त्यावेळी स्थानिकांचा होणारा रोष आणि विरोधच इतक्या मोठ्या प्रमाणात असतो की प्रकल्पाचे काम सुरू होण्यापूर्वीच ते बंद करावे लागते. प्रकल्पाबाबत स्थानिकांना पूर्णपणे विश्वासात न घेतले गेल्याने, असे होते. प्रकल्पाच्या फायद्यांऐवजी तोट्याबाबत ज्यावेळी अधिक चर्चा होते, त्याचवेळी मोठ्या प्रमाणात स्थानिक विरोध करतात आणि प्रकल्प राबवू देत नाहीत. परिणामी, विकासात अडथळा येतो आणि तो प्रदेश मागासलेला राहतो. इतर प्रदेशांप्रमाणे आपल्या प्रदेशाचा विकास करायचा असेल तर केवळ विरोध करून चालणार नाही. संबंधित प्रकल्प काय आहे, त्याचा नेमका आपल्याला किती लाभ होणार आहे, याचीही माहिती नीट समजून घेणे आवश्यक आहे.

सद्यपरिस्थिती पाहता रिफायनरी प्रकल्पाची ना शासन दरबारी चर्चा होत आहे ना कोकणवासीयांमध्ये. या प्रकल्पाचे भिजत घोंगडे कायम असून आता याबाबतच्या चर्चेला थेट स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतरच मुहूर्त मिळणार असे दिसते. कारण, रिफायनरी प्रकल्प बारसू येथे राबविण्यासाठी गेल्या दोन वर्षांपूर्वी येथे शासनाकडून प्रयत्न झाले होते. शासकीय दरबारी यासाठी हालचालींना सुरुवात होताच स्थानिक पत्रकार शशिकांत वारिशे यांनी याबाबतचे वृत्त प्रसिद्ध करून रिफायनरी प्रकल्प बारसू येथे राबविण्यासाठी सरकार प्रयत्न शील असल्याची जनजागृती त्यांनी केली होती. ५ फेब्रुवारी २०२३ रोजी त्यांनी याबाबतचे वृत्त प्रसिद्ध केले होते आणि त्यात रिफायनरी समर्थक पंढरीनाथ आंबेरकरच्या नावाचाही उल्लेख केला होता, मात्र वृत्त प्रसिद्ध केल्याच्या नेमक्या दुर्सया दिवशीच आंबेरकर याच्या जीपसोबत वारिशेंच्या दुचाकीचा अपघात घडला आणि ७ फेब्रुवारी २०२३ रोजी शशिकांत वारिशेंचा उपचारादरम्यान मृत्यूही झाला. याप्रकरणी पंढरीनाथ आंबेरकरला अटक झाली. संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी सरकारकडून एसआयटीही नेमण्यात आली, आरोपीची रवानगी तुरुंगातही करण्यात आली, मात्र शशिकांत वारिशेंच्या मृत्यूनंतर कोकणवासीयांचा संताप इतका अनावर झाला होता की, रिफायनरीसाठी होणारे सर्व प्रयत्न हाणून पाडण्याचा निर्धारच त्यांनी केला होता. नेमके घडलेही तसेच. हा प्रकल्प येथे राबविण्यासाठी जमीन योग्य आहे की नाही, यासाठी करण्यात येणाऱ्या माती परीक्षण आणि भूजल परीक्षण प्रक्रिया २५ एप्रिल २०२३ रोजीपासून सुरू करण्यात आली होती, मात्र या प्रक्रियेला झालेला विरोध पाहता, पुढील काम करण्यास कदाचित सरकारचेही धाडस झाले नसावे. माती आणि भूजल परीक्षण न होऊ देण्याचा अट्टाहास करणाऱ्या कोकणवासीयांनी अक्षरक्षः जमिनीवर झोपून यास विरोध केला. विशेषतः शेकडो स्त्रियांनी याठिकाणी पुढाकार घेतला होता.

जमावाला पांगवण्यासाठी शासकीय स्तरावर सर्व प्रयत्न झाले. पोलिसांकडून लाठीमार करण्यात आला. अनेकांची धरपकड करून त्यांना पोलीस ठाण्यांपर्यंत नेण्यात आले, परंतु याचा काहीच फायदा झाला नाही. याउलट सरकार कोकणवासीयांच्या जीवावर उठले असून याविरोधात आणखी तीव्र आंदोलन करण्याचा निर्धार कोकणवासीयांनी केला. कोकणवासीयांकडून हजारोंच्या संख्येने पुन्हा एकत्र येत सरकारचा निषेध नोंदवण्यात येऊ लागला. स्थानिकांचा वाढता रोष पाहता माती आणि भूजल परीक्षणापुढे अन्य कोणत्याही प्रक्रिया मार्गी लावण्यास सरकारचे तरी सध्या धाडस होताना दिसत नाही. २०२४ हे वर्ष निवडणुकांचे होते. एप्रिल, मे महिन्यांत लोकसभा निवडणुका तर, ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमध्ये महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुका होत्या. ऐन निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना कोकणवासीयांचा आणखी रोष ओढवून घेणे हे काही परवडणारे नसल्याने या प्रकल्पाविषयी कोणती चर्चाच झाली नाही. त्यातच आता २०२५ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोक्यावर आहेत. त्यामुळे रिफायनरीची चर्चा आता थेट २०२६ सालीच होताना दिसेल. तोपर्यंत या प्रकल्पाचे काहीच खरे नाही.

संशयास्पद मतदार याद्यांमुळे संभ्रमाचे वातावरण!

भारताला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे पूर्ण झाली आहेत. लोकसभेची पहिली सार्वत्रिक निवडणूक ऑक्टोबर १९५१ ते फेब्रुवारी १९५२ मध्ये झाली. म्हणजेच पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीला आता ७३-७४ वर्षे होताहेत. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाच्या प्रजासत्ताकाला २५ वर्षांनी, २०५० मध्ये शंभर वर्षे पूर्ण होतील. अशी मोठमोठी पदकं आपण आपल्या छातीवर मिरवत राहू. पण गेल्या ७३-७४ वर्षांत आपण निकोप, निष्पक्ष, पारदर्शक निवडणूक घेतली आहे का? मग कशाचा अमृत महोत्सव साजरा करतो. यातून आपण खर्या अर्थाने लोकशाही देश झालो आहोत का, निवडणुकीपुरती तरी लोकशाही शिल्लक आहे का?

आधी राजे-रजवाड्यांनी राज्य केले. नंतर त्यांच्या वंशजांनी सो कॉल्ड लोकशाही मार्गाने निवडून येऊन सत्तास्थान कायम ठेवले. मग पक्ष काँग्रेस असेल, नाही तर भाजप असेल. या दोन्ही पक्षांसह आता शेकडो पक्ष निवडणुकीच्या माध्यमातून संसदेपासून महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका लढत आहेत. मात्र गेल्या एक, दोन दशकांपासून निवडणुकीचे समीकरण बदलले आहे. एकच पक्ष ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत सर्वत्र दिसत आहे. जगातील सर्वात मोठा पक्ष म्हणूनही या पक्ष नेतृत्त्वाने स्वतःची पाठ थोपटून घेतली आहे. पुढील ५० वर्षे आम्हीच सत्तेत असणार असे बावनकुळेंपासून अमित शहांपर्यंत सर्वांनी म्हणून झाले आहे.

सामान्य भारतीय माणसाची निवडणुकीबद्दलची मनोभूमिका आणि निवडणुकीच्या पॅटर्नचा विचार केला तर असं लक्षात येतं की देशात दर १०-१५ वर्षांनी सत्ताबदल झालेला आहे. कोणाचीच सत्ता ही सलग, सदासर्वकाळ राहिलेली नाही. मात्र भाजप नेत्यांमध्ये कायम सत्तेत राहण्याचा आत्मविश्वास नेमका कुठून येत आहे? याचाच शोध विरोधीपक्ष घेत आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा आणि त्यानंतर झालेल्या महाराष्ट्र, हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीचा धोंडाळा घेतल्यानंतर अणुबॉम्ब फोडला.

निवडणूक आयोगाच्या मतदार याद्या सदोष असल्याचा त्यांनी आरोप केला. काही लाख नावांची हेराफेरी केली जात असल्याचे ते म्हणाले. त्यासाठी त्यांनी कर्नाटकातील एका लोकसभा मतदारसंघाची केसस्टडी केली आणि त्यातून धक्कादायक माहिती त्यांच्या हाती लागली. एकाच नावाचे अनेक मतदार असल्याचे समोर आले. मतदान कार्ड क्रमांकापासून हा घोळ असल्याचे त्यांच्या लक्षात आले. एकाच घरात शेकडो मतदारांची नावे. वास्तविक त्या घरात मतदार यादीतील कोणीच राहात नसल्याची त्यांच्या तपासात समोर आले. म्हणजे डुप्लिकेट मतदारांचा मोठ्या प्रमाणात समावेश करण्यात आला आहे. एकाच मतदाराचे नाव कर्नाटकात दोन ठिकाणी आणि उत्तर प्रदेशातील लखनऊ किंवा महाराष्ट्रातही मतदारांच्या यादीत आढळले. त्यांनी आदित्य श्रीवास्तव आणि शकुन राणी या मतदारांचे उदाहरण दिले होते.

मतदार यादीतून मतदारांची नावे वगळण्याचा एक पूर्वनियोजित कार्यक्रम सुरू असल्याचा आरोप राहुल गांधींनी केला. काँग्रेस समर्थक असलेल्या मतदारांची नावे ऑटोमेटेड सॉफ्टवेअर वापरून पद्धतशीरपणे वगळण्यात आली. विशेषतः ज्या मतदान केंद्रांवर काँग्रेसचे प्राबल्य आहे, तेथील नावे हटवण्यात आली. हाच आरोप परवा महाराष्ट्रातील सर्वपक्षीय शिष्टमंडळाने राज्य निवडणूक आयुक्त आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या भेटीत केला. त्यांनी थेट देवांग दवे ही व्यक्ती मतदार यादीत नाव समाविष्ट करणे आणि वगळण्याचे काम करते असा आरोप केला.

राहुल गांधींचा आरोप आहे की, मतदारांची नावे वगळण्यासाठी ह्यफॉर्म 6ह्ण वापरला गेला. मात्र, अर्ज करताना वापरलेले मोबाईल क्रमांक कर्नाटकातील नसून, तामिळनाडू किंवा झारखंडसारख्या परराज्यातील होते. महाराष्ट्रातील नेत्यांनी मात्र महाराष्ट्रात बसलेली व्यक्तीच हे काम करते असा आरोप केला आहे. एकूणच मतदार याद्यांवरील संशय वाढत चालला आहे. आधी एकट्या राहुल गांधी यांनी हे आरोप केले आता महाराष्ट्रातील प्रमुख विरोधी पक्ष ठाकरेंची शिवसेना, काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे आणि भाजपेतर अनेक पक्ष करत आहेत.

राहुल गांधींनी यानंतर हायड्रोजन बॉम्ब फोडणार असा दावा केला आहे. निवडणूक आयोगालाच त्यांनी लक्ष केले आहे. त्यांच्या जोडीला आता महाराष्ट्रातील त्यांचे सहयोगी पक्ष आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना आली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका मतदार याद्या सुधारल्याशिवाय घेऊ नका, असा पवित्रा या शिष्टमंडळाने दोन दिवसांच्या सलग भेटीनंतर घेतला आहे. कारण स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी वापरल्या जार्णाया मतदार याद्या या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्याच वापरल्या जाणार आहेत.

या मतदार याद्या दोषपूर्ण आहेत, असे विरोधकांचे एकमत आहे. आठ वेळा निवडून आलेले बाळासाहेब थोरात कसे काय पडू शकतात, असा सवाल राज ठाकरेंनी केला. विधानसभेत महायुतीला २३२ जागा मिळाल्या आहेत. एवढा मोठा विजय मिळाल्यानंतरही सत्ताधार्यांमध्ये उत्साह आणि जल्लोष दिसलेला नाही, त्याचे कारण हा विजय त्यांच्याही पचनी पडलेला नाही. जर जिंकलेले आणि पराभूत झालेले असे सर्वांनाच निवडणुकीबद्दल शंका असेल तर मग सुधारित मतदार याद्या झाल्याशिवाय निवडणुका घेऊ नका, असे विरोधकांनी एकमुखाने निवडणूक आयोगाला सांगितले आहे.

राज ठाकरे हे सातत्याने पक्ष नेते आणि कार्यकर्त्यांच्या बैठका घेत आहेत. यात त्यांनी 'भावी नगरसेवकांना' कोणत्या मतदार संघातून निवडणूक लढवणार तेथील मतदार याद्या तपासा, त्या बरोबर असतील तरच निवडणूक लढवा, असे स्पष्ट आदेश दिले आहेत. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरातांनी सांगितले परराज्यातून आणि बाहेर गावाहून शिकायला आलेले विद्यार्थी मतदार दाखवले जात आहेत. म्हणजेच दुबार मतदाराचा मुद्दा राहुल गांधी यांच्यानंतर राज्यातही उपस्थित केला जात आहे. राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत व्हीव्हीपॅट मशिन्स वापरणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

आधीच या निवडणूक प्रक्रियेवर ना राजकीय पक्षांचा ना जनतेचा विश्वास बसत आहे. त्यातल्या त्यात आपले मत कोणाला गेले हे सत्यापित करण्याची एकमेव परीक्षा असलेले व्हीव्हीपॅटही या निवडणुकीत वापरणार नसतील तर निवडणुकीतील घोळाचा कोणताच पुरावा शिल्लक ठेवायचा नाही म्हणून हे केले जात आहे का? हा प्रश्नही अवास्तव ठरत नाही. पारदर्शक आणि निष्पक्ष निवडणुका घेणे हेच आयोगाचे काम आहे. तेव्हा त्यांनी त्यासाठीची सर्व यंत्रणा अधिकाधिक वापरलीच पाहिजे. गेल्या चार-पाच वर्षांपासून राज्यात मुंबई महापालिकेसह २९ महापालिकेच्या निवडणुका कमी अधिक काळाच्या फरकाने रखडलेल्या आहेत. आता जेव्हा कोर्टाच्या सर्वोच्च आदेशाने त्या घेतल्या जाणार आहेत तेव्हा त्या पारदर्शक झाल्या पाहिजे, या राजकीय पक्षांच्या मागणीत आक्षेप असण्याचे कोणालाही कारण नाही. लोकशाहीच्या शुद्धीकरणासाठी हे आवश्यकच आहे.

सध्या विरोधी पक्षाने सुरू केलेली निवडणूक शुद्धिकरणाची मोहीम प्रथमच होत आहे असेही नाही. मतपत्रिकांवर निवडणूक होत होती तेव्हा सर्व धुतल्या तांदळासारखं होतं असं मानण्याचंही काही कारण नाही. तेव्हाही दुबार मतदार होते. मात्र त्यांचा आतासारखा मास व्होटिंगसाठी वापर झाल्याचे कधी समोर आले नाही. बुथ कॅप्चरिंगसारखे प्रकार बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश या हिंदीपट्ट्यात होत होते. मतदानातील या गैरप्रकारांना रोखण्यासाठी आणि वेगवान मतदान, मतमोजणी प्रक्रियेसाठी १९९० च्या दशकात तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या काळात ईव्हीएमचा प्रायोगिक तत्वावर वापर करण्यात आला. ईव्हीएमवर सुरुवातीपासून शंका उपस्थित केल्या जातात.

संपूर्ण देशात ईव्हीएमचा वापर करून आलेले पहिले सरकार भाजपचेच होते. २००४ मध्ये अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान झाले होते. मात्र भाजपचेच लालकृष्ण अडवाणी, सुब्रम्हण्यम स्वामी, किरीट सोमय्या यांनी कशा प्रकारे ईव्हीएम हॅक होतात हे सांगत होते. त्याचे डेमोदेखील दिले होते. २०१४ ला विश्वजीत कदम यांनी पुण्यातून निवडणूक लढवली तेव्हा देवेंद्र फडणवीसांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन एक लाख मतदार सांगलीहून आणल्याचे पुरावे देत होते. त्यामुळे आता मतदार याद्यांचे शुद्धीकरण, सुधारित मतदार याद्या करून निवडणूक घेण्याची संधी फडणवीसांच्याच सरकारच्या काळात चालून आली आहे. सध्या असलेल्या सदोष मतदार याद्यांवर विरोधी पक्ष निवडणुका लढवतील का, असा एक प्रश्न सध्या उपस्थित होत आहे. त्याबद्दल अजून विरोधी पक्षांनी भूमिका स्पष्ट केलेली नाही.

आता आणखी एक कळीचा प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे निवडणूक आयोगासमोर महाविकास आघाडी आणि मनसे एकत्र गेले. आता ते राहुल गांधींप्रमाणे जनतेमध्ये हा मुद्दा घेऊन जाणार का? कारण राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर थेट हल्लाबोल सुरू केला आहे. त्यामुळे या पक्षांनी आता एक-दोन दिवसांचा इव्हेंट करून चालणार नाही. त्यांना दाखवून द्यावे लागणार आहे की आम्ही या मुद्द्यावरच निवडणूक लढवणार आहोत. एक प्रकारे विरोधकांकडून सत्ताधार्यांविरोधात व्होटचोरीचं नॅरेटिव्ह सेट केले जात आहे. याचा फायदा त्यांना आगामी निवडणुकीत इतर पक्षांना सोबत घेण्यासाठी होऊ शकतो.

राज ठाकरे यांची आणि त्यांच्या पक्षाची वैचारिकता ही काँग्रेससोबतच्या जवळीकीची नाही. त्यांचा महाविकास आघाडीत प्रवेश झाला तर राज ठाकरे यांच्यासोबत काँग्रेसलाही अनेक प्रश्नांना उत्तरे द्यावी लागू शकतात. राज ठाकरे यांनी मराठी भाषा, मशिदीवरील भोंगे आणि सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे उत्तर भारतीयांना विरोध यांचा त्यांनी त्याग केला का, असे मनसेला विचारले जाऊ शकते. तर हेच मुद्दे उत्तर भारतात काँग्रेसला अडचणीचे होऊ शकतात. मात्र व्होटचोरीचं नॅरेटिव्ह पुढे करून चारही पक्ष एकत्र आले तर हे भावनिक मुद्दे बाजूला पडून वैचारिक तडजोड मानली जाईल. राजकारणाच्या शुद्धिकरणासाठी आम्ही एकत्र आलो असे सांगता येईल. फक्त भाजपला विरोध या एका मुद्द्यावर एकत्र येणे तेवढं फायदेशीर होऊ शकत नाही, तर लोकशाही वाचवण्यासाठी आम्ही एकत्र आलो, हा सर्व स्थरातील आणि जातीधमार्तील मतदारांपर्यंत पोहोचणारा मुद्दा आहे.

मुंबई महापालिकेची निवडणूक भाजपला धर्माच्या आधारावर लढायची आहे, असे दिसते. अमित साटम भाजपचे मुंबई अध्यक्ष झाल्याबरोबर त्यांनी शिवसेना जिंकली तर खान महापौर होईल, असे नॅरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे जैन, मारवाडी, गुजरातीविरुद्ध मराठी हाही मुद्दा कधी गुप्त तर कधी उघडपणे समोर आणला जात आहे. त्यासाठीच भाजपच्या कबुतरांची फडफड सुरू आहे. धमार्चा मुद्दा फक्त मुंबई महापालिकेपुरताच नाही, तर महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतही हाच मुद्दा भाजप आणण्याच्या तयारीत आहे. देवेंद्र फडणवीसांनी एका भाषणात म्हटले होते की, ८५ टक्के मराठा समाज हिंदुत्ववादी आहे. विधानसभेत 'बटेंगे तो कटेंगे' हा मुद्दा भाजपसाठी फायद्याचा ठरलाच होता.

याचे छोटे-छोटे प्रयोग पडळकर, राणे आणि संग्राम जगताप ठिकठिकाणी करताना दिसत आहेत. ओबीसीविरुद्ध मराठा या मुद्द्यावर ही निवडणूक भाजपला न्यायची नाही. त्यामुळेच धर्माच्या मुद्द्यावर निवडणूक नेण्याचे त्यांचे प्रयत्न राहाणार आहेत. विरोधी पक्षांना हिंदुत्वावर निवडणूक घेऊन जायची नसेल तर व्होटचोरीचा मुद्दा हा महाविकास आघाडीला आणि त्यांचा नवा भिडू राज ठाकरे यांच्याही फायद्याचा ठरू शकतो. मुंबईतील दलित आणि मुस्लीम मतं ही उद्धव ठाकरे यांच्याकडे आकर्षित झालेली आहेच. ती राज ठाकरे यांच्या एन्ट्रीमुळे दुरावली जाऊ नये यासाठी एका तटस्थ मुद्द्याची त्यांना गरज आहे. लोकशाही वाचवण्याचा मुद्दा सर्व जाती धमार्तील लोकांना एकत्रित आणणारा आहे. आता भाजपेतर पक्ष तो किती नेटाने पुढे नेतात, यावरच सर्वकाही अवलंबून आहे.

सज्जता आणि सज्जनता

'सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ' असं म्हणणारी भगवद्गीता सुख आणि दुःख, जय आणि पराजय या साऱ्याच्या पलीकडे पाहण्याची एक निरामय दृष्टी देते. सामान्यतः सुख-दुःख, शीत-उष्ण हे सारे विरुद्धार्थी शब्द म्हणून समोर येतात; पण कधीकधी त्यांच्यातला विरोध मावळून ते एकमेकांना पूरक ठरतात. दुःखाची झळ लागल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही, असं जेव्हा आपण म्हणतो तेव्हा सुख-दुःख एकमेकांसाठी पूरक होऊन जातात. या विरोधाभासात एक अंतःसूत्र सापडतं. प्रपंच-परमार्थ, रामकारण-राष्ट्रकारण, एकांत-लोकांत, शक्ती-भक्ती, सगुण-निर्गुण या साऱ्या संकल्पनाही सामान्यपणे विरोधी वाटाव्या अशाच आहेत. समर्थ रामदास स्वामींनी मात्र या साऱ्या व्यवहारांना विवेकाच्या चौकटीतून पाहिलंय. समत्वानं त्यांचा स्वीकार केलाय आणि त्यांचा एकजिनसी पट आपल्यासमोर मांडलाय. राष्ट्रकारणाच्या मुळाशी रामकारणाचं अधिष्ठान हवं आणि रामकारणाचं अंतिम ध्येय राष्ट्रनिर्माण हेच हवं, याबाबत समर्थ अत्यंत आग्रही होते. 'पहिले ते हरिकथा निरूपण, दुसरे ते राजकारण' असं म्हणणाऱ्या समर्थांनी देव आणि देश याबाबतचे सारे विरोधी पूर्वग्रह खोडून काढले. परमार्थ करणाऱ्यांनी प्रपंच सोडून द्यावा आणि प्रापंचिकांना परमार्थाचं वावडं असावं, हा असाच एक पूर्वग्रह! त्यावर, 'जो प्रपंची सावधान, तो(च) परमार्थ करील जाण' अशी जाणीव त्यांनी समाजाला करून दिली होती. ते एकांतप्रिय होते. 'कल्पनेचा प्रांत तो माझा एकांत' अशी ओळ एखाद्या घळीत, डोंगरमाथ्यावर त्यांना स्फुरली असावी. त्याच समर्थांनी मठ, मंदिरांची स्थापना, भारतभरचा प्रवास यात उदंड लोकसंग्रह केला होता. जो सामर्थ्यवान सत्ताधीश आहे, त्याचं आचरण सज्जनतेचं असावं आणि सज्जनानेही शक्तीची उपासना करावी, हा त्यांचा आग्रह होता. त्यांचा भक्तिमार्ग सगुण रामकथेला ब्रह्माण्ड भेदून पल्याड नेणारा असला, तरी अंतरंगात निरंजन आत्मारामाशी अभिन्नपणे जोडलेला होता. सगुण रक्षून निर्गुण, बोलत जावे, याबाबत आग्रही होता. वरवर विरोधी वाटणाऱ्या या साऱ्या पटात 'सज्जता' आणि 'सज्जनता' या उभ्या-आडव्या धाग्यांचं अंतःसूत्र होतं. समर्थांच्या साहित्यातून त्यांच्या भूमिका मांडणारी सूत्रे शोधण्याचा प्रयत्न या मालिकेतून करू या.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार, २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५



महाराष्ट्रातील महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणात धक्कादायक ट्विस्ट!

४ वेळा बलात्कार, २१ वेळा तक्रार...



मुंबई ,

साताऱ्याच्या फलटणमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. डॉक्टर तरूणीच्या आत्महत्येनंतर संपूर्ण महाराष्ट्र हादरलाय. पोलीस अधिका-यानं चारवेळा लैंगिक केल्याचा आरोप करत महिला डॉक्टरानं आपलं जीवन संपवलंय. २१ वेळा तक्रार करूनही दखल घेतली नसल्याचं म्हणत महिला डॉक्टरानं टोकाचं पाऊल उचललंय. हातावर सुसाईड नोट लिहित महिला डॉक्टरानं पोलीस अधिकारी गोपाल मदने आणि डॉक्टर महिला ज्या घरात राहत होती त्या घरमालकाचा मुलगा प्रशांत बनकरवर गंभीर आरोप केलाय. माझ्या मरण्याचं कारण पोलीस निरीक्षक गोपाल बदने ज्याने माझा रेप केला आणि प्रशांत बनकर याने माझा ४ महिने मानसिक, शारिरिक छळ केला. हातावर अशी सुसाईट नोट महिला डॉक्टरनं लिहून ठेवलीय. दरम्यान या प्रकरणी दोन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, एफआयआर दाखल करण्यासाठी पोलिसांनी टाळाटाळ केल्याचा आरोप डॉक्टर महिलेच्या नातेवाईकांनी केलाय. या धक्कादायक घटनेची महिला राज्य आयोगानं देखील दखल घेतलीय. प्रकरणाच्या सखोल तपास करण्याचे निर्देश महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकरांनी दिले आहेत. तर या प्रकरणाची एसआयटी चौकशी करावी अशी मागणी सुषमा अंधारेंनी केली होती. डॉक्टर तरूणीच्या आत्महत्या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील दखल घेतलीय. घटना समोर आल्यानंतर संबंधित पोलीस अधिकाऱ्याचं निलंबन करण्यात आलंय.. तसंच आरोपींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देखील मुख्यमंत्री फडणवीसांनी दिले आहेत. संबंधित डॉक्टर गेल्या काही महिन्यांपासून पोलीस आणि आरोग्य विभागातील वादात अडकल्या होत्या, वैद्यकीय तपासणीसंदर्भात पोलिसांशी वाद झाल्यानंतर त्यांची चौकशी करण्यात आली होती. या चौकशीदरम्यान डॉक्टर तरूणीनं आपल्यावर अन्याय होतं असल्याचं वरिष्ठांना सांगितलं होतं असा आरोप तिच्या सहकाऱ्यांनी केला. त्यामुळे आरोपींना अटक केल्यानंतर या प्रकरणात आणखीन मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे. साताऱ्यातील फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर संपदा मुंडेंच्या आत्महत्येनंतर राज्यात खळबळ उडाली आहे. संपदा मुंडेने एका हॉटेलच्या रूममध्ये आत्महत्या केली असून, टोकाचं पाऊल उचलण्याआधी दोन पोलीस अधिकाऱ्यांचा उल्लेख केला आहे. तिने हातावर सुसाईड नोट लिहिली असून, आपल्यावर चार महिने बलात्कार झाल्याचा आरोप केला आहे. या घटनेमुळे महाराष्ट्र हादरला असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेतली आहे. फलटण डॉक्टर आत्महत्या प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून संबंधित पोलीस अधिकारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सातारा पोलीस अधिक्षकांकडून घटनेची माहिती घेतली. संबंधित पोलिसांना तत्काळ निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसंच आरोपींवर कठोर कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

दाऊदच्या ड्रग्ज पुरवठादाराला ३ दिवसांपूर्वी अटक

मुंबई विमानतळावर येणारे ड्रग्ज नेटवर्क थेट या देशातून चालवले

मुंबई,

विमानतळाचा वापर करून थायलंडमधून भारतात हायब्रिड गांजाची तस्करी करणाऱ्या एका मोठ्या आंतरराष्ट्रीय ड्रग्ज सिंडिकेटचा पदार्फाश करण्यात आला आहे. हे नेटवर्क ड्रग्ज किंगपिन जमजीथ के.पी. उर्फ समझू याच्या नेतृत्त्वात सुरु होते. समझू काही काळापूर्वी थायलंडहून दुबईला पळून गेला होता. या प्रकरणात आतापर्यंत चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी तिघांना ९ जुलै २०२३ रोजी अटक करण्यात आली होती आणि त्यांच्याकडून ४ किलो १३३ ग्रॅम हायब्रिड गांजा जप्त करण्यात आला होता. चौकशीदरम्यान समझूचे नाव समोर येताच, त्याच्याविरुद्ध लूकआउट नोटीस जारी करण्यात आली.

ड्रग्ज नेटवर्क थायलंडमधून कार्यरत

२१ ऑक्टोबर रोजी दुबईहून परतल्यानंतर मंगळुरू विमानतळावर समझूला अटक करण्यात आली. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, समझू प्रामुख्याने मालवाहतुकीद्वारे भारतात ड्रग्ज आयात करत असे. थायलंडहून त्याच्या माणसांनी पाठवलेले पार्सल प्रथम मुंबई विमानतळावर, नंतर दिल्ली विमानतळावर पोहोचायचे. कधीकधी, दोन्ही विमानतळांवर एकाच वेळी डिलिव्हरी होत असे. त्यानंतर हे कन्साइनमेंट विविध राज्यांमधील वितरण केंद्रांवर पाठवले जायचे. तपासात असे आढळून आले की, केरळमधील कोझिकोड (कालिकत) येथील रहिवासी असलेला समझू गेल्या काही वर्षांपासून थायलंडमध्ये राहत होता. त्याने यापूर्वी कंबोडियामध्ये नऊ वर्षे तंबाखूच्या व्यवसायाचे काम केले होते. पण नंतर तो ड्रग्ज तस्करीकडे वळला. त्याने तरुण भारतीय पुरुषांना



त्याच्या नेटवर्कमध्ये आकर्षित केले आणि हायब्रिड गांजासाठी पुरवठा साखळी स्थापन केली.

तो रोख रक्कम मिळवणे, पोहोचवणे आणि रोख व्यवहारांच्या संपूर्ण प्रणाली साखळीवर वैयक्तिकरित्या लक्ष ठेवत असे. तो सध्या दिल्ली पोलिसांच्या ताब्यात आहे आणि मुंबईच्या अंमली पदार्थ विरोधी तपास संस्थांकडून त्याची पुढील चौकशी केली जाईल. विशेष म्हणजे, २१ ऑक्टोबर रोजी दुबईहून मंगळुरूला परतताना समजूला अटक करण्यात आली होती, तर दुसऱ्याच दिवशी, म्हणजे २२ ऑक्टोबर रोजी, दाऊद इब्राहिमच्या ड्रग्ज नेटवर्कशी संबंधित सलीम शेखलाही दुबईहून हद्दपार केल्यानंतर मुंबई विमानतळावर अटक करण्यात आली. दोन दिवसांत परदेशातून आलेल्या दोन ड्रग्ज माफियांना झालेली ही अटक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

मार्च २०२४ मध्ये सांगली येथून जप्त केलेल्या २५६ कोटी रुपयांच्या एमडी ड्रग्ज प्रकरणात सलीम शेखचा संबंध असल्याचे पूर्वी मानले जात होते. परंतु आता तपासात असे दिसून आले आहे की काही महिन्यांपूर्वी तेलंगणातील विकाराबाद आणि उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे जप्त केलेल्या ३२७ कोटी रुपयांच्या एमडी ड्रग्जच्या पुरवठ्याशीही त्याचे संबंध आहेत.

महाराष्ट्रात कॅबिनेटमध्ये 'गुजरात पॅटर्न'?



मुंबई ,

गुजरातनंतर आता महाराष्ट्रात कॅबिनेटमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता आहे. सुमार कामगिरी करणाऱ्या, वादग्रस्त ठरलेल्या अनेक मंत्र्यांना घरचा रस्ता दाखवून त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाऊ शकते. पुढील वर्षभरात मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला जाईल. त्यांच्या कामाचं मूल्यमापन होईल. त्यामुळे अनेक मंत्र्यांची धाकधूक वाढली आहे. शिंदेसेनेचे अनेक मंत्री वर्षभरात गोत्यात आले आहेत. त्यामुळे त्यांच्यापैकी कोणाकोणाला नारळ मिळणार याची चर्चा आतापासूनच रंगू लागली आहे. राज्यातील महायुती सरकारनं अद्याप वर्ष पूर्ण केलेलं नाही. आम्ही मंत्र्यांना काम करण्यास, स्वतःला सिद्ध करण्यास पुरेसा वेळ देऊ, अशी माहिती भाजपच्या एका वरिष्ठ नेत्यानं दिली. मिड डेनं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. 'दोन किंवा अडीच वर्षांनी मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला जातो. ज्यांना अपेक्षित कामगिरी करता येणार नाही, त्यांना नारळ देण्यात येईल,' अशा शब्दांत भाजपच्या वरिष्ठ नेत्यानं पुढील प्लान सांगितला.

भाजपनं गेल्याच आठवड्यात गुजरात मधील मंत्रिमंडळात मोठे बदल केले. सरकारमधील सर्वच्या सर्व १६ मंत्र्यांचे राजीनामे घेण्यात आले. केवळ मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांचा राजीनामा घेतला गेला नाही. यानंतर दुसऱ्याच दिवशी २५ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यात अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली. मागील सरकारमधील केवळ ६ जणांना पुन्हा संधी दिली गेली. नव्या मंत्रिमंडळातील १२ जण हे पहिल्या टर्मचे आमदार आहेत. आता हाच गुजरात फॉम्युर्ला महाराष्ट्रात लागू होण्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही मंत्री वादात सापडले आहेत. त्यांच्या वर्तणुकीमुळे महायुती सरकारची प्रतिमा डागाळली आहे. आतापर्यंत केवळ धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा झाला आहे. अन्य वादग्रस्त मंत्र्यांना केवळ समज देण्यात आली आहे. यातील अनेकांना पुढील वर्षभरात डच्चू मिळू शकतो. गेल्या वर्षी राज्यात विधानसभा निवडणूक झाली. ५ डिसेंबरला फडणवीस सरकार अस्तित्त्वात आलं. सध्याच्या घडीला मंत्रिमंडळात ३९ सदस्य आहेत. यातील ३३ कॅबिनेट, तर ६ राज्यमंत्री आहेत. सर्वाधिक मंत्री भाजपचे आहेत. मंत्रिमंडळात भाजपचे १९, शिंदेसेनेचे ११ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ९ जण आहेत.

मुंबईला अवकाळी पावसाचा तडाखा!

राज्यातील अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट

मुंबई ,

मुंबईत गुरुवारी संध्याकाळच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. दक्षिण मुंबईच्या काही भागात अवकाळी पावसाने थैमान घातले. मान्सूनने माघार घेतल्यानंतर मुंबईत ऐन दिवाळीत दुसऱ्यांदा पावसाने हजेरी लावली. भारतीय हवामान खात्याने गुरुवारी संध्याकाळी मुंबई, ठाणे, सिंधुदुर्ग, सातारा, सोलापूर, कोल्हापूर आणि पुणे या जिल्ह्यांमध्ये ३०-४० किमी प्रतितास वेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम पावसाचा इशारा दिला होता. हवामान विभागाचा हा अंदाज खरा ठरला.

पुढील काही दिवसांत वादळी



वाऱ्यांसह पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला असून विदर्भ प्रदेश वगळता संपूर्ण राज्यात यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान खात्याने, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने चक्रीवादळी वाऱ्यांच्या अभिसरणामुळे अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. १० ऑक्टोबर रोजी मान्सून परतल्यापासून मुंबई शहरात सामान्यपेक्षा जास्त तापमान आणि हवेचा दर्जा निदेर्शांक अतिशय खराब पातळीवर नोंदवला गेला होता. तसेच फटाक्यांच्या आतषबाजीमुळे हवेची गुणवत्ता कमालीची ढासळली होती.

मुंबई शहर आणि उपनगरांसाठी पुढील ४८ तासांसाठी स्थानिक हवामान अंदाजानुसार, संध्याकाळी/रात्री आकाश अंशतः ढगाळ राहील आणि वादळी वाऱ्यांसह मध्यम पाऊस आणि जोरदार वारे येण्याची शक्यता आहे. कमाल आणि किमान तापमान सुमारे ३५ अंश सेल्सिअस राहील आणि अनुक्रमे २६ अंश सेल्सिअस राहील. दरम्यान, दिवाळीच्या सणादरम्यान खराब श्रेणीत (२०० पेक्षा जास्त) असलेला मुंबईचा एक्यूआय गुरुवारी मध्यम श्रेणीत १०९ नोंदवला गेला.

महाराष्ट्रातील 'या' शहराचं नाव बदलणार, केंद्र सरकारने दिली मंजुरी... शरद पवारांच्या एनसीपीचा बालेकिल्ला

मुंबई,

सांगलीच्या इस्लामपूर शहराचं अखेर नामकरण करण्यात आलं आहे. आता इस्लामपूर हे शहर ईश्वरपूर नावाने ओळखलं जाणार आहे. राज्य सरकारच्या प्रस्तावानंतर केंद्र सरकारने इस्लामपूरचं नाव ईश्वरपूर करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. त्यामुळे सांगली जिल्ह्यातलं इस्लामपूर शहर ईश्वरपूर शहर या नावाने ओळखले जाणार आहे.

राज्य सरकारकडून अधिवेशनामध्ये मंत्री छगन भुजबळ यांनी इस्लामपूर शहराचा ईश्वरपूर शहर असं नाव करण्याची घोषणा करत केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्यात आल्याची माहिती दिली होती. त्यानंतर आता अखेर इस्लामपूर शहराचं ईश्वरपूर शहर नामकरण करण्यास केंद्राने देखील मान्यता दिली आहे. महायुती सरकारकडून राज्यातल्या अनेक जिल्ह्यांची नावे बदलण्यात आली आहेत, त्यामध्ये इस्लामपूर शहराचं नाव देखील बदलण्याची मागणी झाली होती. त्यानुसार महायुती सरकारने इस्लामपूर शहराचे नाव बदलण्याची प्रक्रिया केली होती. इस्लामपूर शहर हे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांचा मतदारसंघ आहे.

मुंबईत तरुणीवर चाकूहल्ला करुन तरुणाची आत्महत्या... काळाचौकीत घडला प्रकार

मुंबई ,

मुंबईत तरुणीवर चाकूने हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आहे. तरुणीवर चाकूने हल्ला केल्यानंतर तरुणाने आत्महत्या केली. काळाचौकी परिसरात ही घटना घडली आहे. तरुणी या हल्ल्यात गंभीर जखमी झाली असून, तिला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. रुग्णालयात तिच्यावर उपचार सुरु आहेत. दरम्यान या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

नेमकं काय घडलं?

काळाचौकी परिसरात एका तरुणाने तरुणीवर जीवघेणा हल्ला करून आत्महत्या केली. हल्यात जखमी झालेल्या



तरुणीला तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल केलं आहे. तरुणीवर हल्ला केल्यानंतर आरोपीने स्वतःलाही मारून घेतलं. सुरुवातीला त्याची प्रकृती गंभीर होती, मात्र नंतर मृत्यू झाला. या हल्यामागील नेमकं कारण अस्पष्ट असून काळाचौकी पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहे.

मृत तरुणाचे नाव सोनू बरई आहे. तर जखमी मुलीचे नाव हे मनिषा यादव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दोघांमध्ये प्रेमसंबध होते. मृत तरुण वारंवार मुलीवर संशय घेत होता. यावरून दोघांमध्ये ८ दिवसापूर्वी वाद झाला होता. यातून दोघांचा ब्रेकअप झाला होता.

मृत तरुणाने शेवटचे भेटण्यासाठी मुलीला नर्सिंग होममध्ये बोलावले होते. त्यावेळी दोघांमध्ये वाद झाला. यावेळी राग अनावर झालेल्या तरुणाने मुलीवर धारदार शस्त्राने वार केले. मुलीवर हल्ला केल्यानंतर त्याच शस्त्राने तरुणाने स्वतःला मारून घेत आयुष्य संपवलं.

कुर्ला स्टेशनच्या सीसीटीव्हीमध्ये दिसला, बिहारमधील स्टेशनवर अटक

मुंबई,

पोलिसांना कधीकधी छोटे छोटे पुरावे सापडतात आणि हेच पुरावे गुन्हेगारापर्यंत घेऊन जातात. याची प्रचिती मुंबई पोलिसांना नुकताच आली. मुंबई गुन्हे शाखेने अशाच सीसीटीव्ही फुटेजवरून आरोपीला बिहारमधील एका रेल्वे स्टेशनवर अटक केली. सुलेमान रज्जाक कुजरा (४०) असे या आरोपीचे नाव आहे. हा गुन्हा मुंबईत घडला आणि त्यानंतर आरोपी पळून गेला होता.

असा घडला गुन्हा

१५ ऑक्टोबर २०२५ च्या रात्री वाकोला येथे सुलेमानरज्जाक कुजरा याने त्याची १४ वर्षांची मुलगी असगरीची हत्या केली. एवढंच नाही तर त्याने पत्नी नसीमा (३५) हिलाही गंभीर जखमी केले. आता हे प्रकरण अंगलट येणार हे लक्षात आल्यानंतर त्याने मोबाईल फोन बंद केला आणि घरातून पळ काढला. पत्नी जखमी असल्यामुळे हे प्रकरण लगेच उघड झालं. काही वेळातच वाकोला पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य पाहून मुंबई गुन्हे शाखेच्या युनिट ८, युनिट ९ आणि युनिट १० मधील पथके तपासासाठी तैनात करण्यात आली.



याच घटनेत, तपास पथकाने आरोपीच्या घरातील आणि मुंबईतील विविध रेल्वे स्टेशनांवरील डझनभर सीसीटीव्ही फुटेज पाहिले. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक लक्ष्मीकांत साळुंखे यांनी सांगितले की, कुर्ला रेल्वे स्टेशनातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात तपास पथकाला आरोपी दिसला. त्यानंतर बाजूलाच लोकमान्य टिळक टर्मिनस असल्याने आरोपी सुलेमान कुर्ला स्टेशनवर आला असावा, असा अंदाज तपास पथकाने लावला. आरोपी मूळ बिहारचा असल्याची माहिती तपास पथकाला त्याच्या वाकोल्यातील शेजाऱ्यांकडून मिळाली होती. शिवाय त्याचा बिहारमधील पत्तादेखील पोलिसांना मिळाला होता. म्हणून, तपास पथकाने बिहारमधील त्याच्या गावी जाणाऱ्या मेल गाड्यांची यादी तयार केली आणि एक पथक बिहारला रवाना झाले. आरोपी बिहारमधील एका रेल्वे स्टेशनवर उतरताच त्याला अटक करण्यात आली.

हत्येचे कारण

बापाने मुलीची हत्या करून पत्नीला जबर जखमी करणे यामागे कोणते कारण असावे याचा शोध पोलिसांनी घेतला. तेव्हा गुन्हे शाखेच्या तपासात असे आढळून आले की, आरोपी पक्का दारूड्या होता. तो दारूच्या आहारी गेल्यामुळे पत्नी आणि मुलीशी त्याचे वारंवार भांडणे होत होती. १५ ऑक्टोबर रोजीही तो मद्यधुंद अवस्थेत होता. अशातच भांडण झाले. त्यांच्यातील भांडण टोकाला गेले आणि दारूच्या आहारी तसेच रागावरील नियंत्रण सुटल्याने सुलेमानने घरातील धारदार शस्त्राने त्यांच्यावर हल्ला केला. यात मुलीचा मृत्यू झाला, तर पत्नी जबर जखमी झाली.

ऐन दिवाळीत मुंबईमध्ये अग्नितांडव, १५ वर्षीय मुलाचा मृत्यू

मुंबई,

मुंबईतील कफ परेड परिसरातील एका चाळीत सोमवारी पहाटेच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत होरपळून १५ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आणि तिघे जखमी झाले. ऐन दिवाळीत घडलेल्या या घटनेनं परिसरात खळबळ उडाली होती. दुर्घटनेबाबतची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि एका तासाच्या आत आग विझवण्यात यश आलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कफ परेड येथील मच्छिमार नगरमध्ये आज पहाटेच्या सुमारास एका चाळीत अचानक आग लागली. चाळीत आग लागल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरलं आणि धावपळ सुरू झाली. आगीच्या धुरामुळे आणि ज्वालांमुळे जीव वाचवण्यासाठी नागरिक सैरावैरा धावू लागले. काहींनी याबाबतची माहिती अग्निशमन दलाला दिल्यानंतर अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल जाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नांनंतर एका तासाच्या आत आगीवर नियंत्रण मिळवले. आगीचे स्वरूप पाहता ती विद्युत वायरिंग आणि ईव्ही बॅटरीमुळे लागल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

या दुर्घटनेत एका १५ वर्षीय तरुणाने आपला जीव गमावला आहे. तसंच इतर तीन जखमींना तातडीने उपचारासाठी सेंट जॉर्ज रुग्णालयात दाखल करण्यात आलं. डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार सुरू केले असून त्यांच्या प्रकृती स्थिर असल्याचे समजते. दरम्यान, या आगीचे नेमकं कारण काय होतं, याचा तपास पोलीस करत आहेत. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी पंचनामा केला असून, पुढील तपास सुरू आहे. आगीमुळे मच्छिमार नगरमधील रहिवाशांचं मोठं नुकसान झालं आहे. अनेकांची घरे जळून खाक झाली आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक आमदार आणि खासदार यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com